# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

वैद्यकिय आरोग्य विभाग, नवीन प्रशासकिय इमारत, ६ वा मजला

जा.क्र. भिनिशमनपा./वैआवि/ 248/2022 ,दि.03/02/२०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक खालील संवर्गातील अस्थायी स्वरुपाची पदे करार पद्धतीने भरावयाची आहेत. यानुसार मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार विहीत अर्हता प्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यानुसार इच्छुक उमेदवारांनी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, नवीन प्रशासकिय इमारत, वैद्यकिय आरोग्य विभाग, ६ वा मजला, भिवंडी येथे नमुद केलेल्या तारखेपर्यंत अर्ज सादर करावे. अर्जाचा नमुना व सदर जाहिरात भिवंडी मनपा. www.bncmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

➢ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील पदाचा तपशिल –

१. स्टाफ नर्स (**Staff Nurse**) - ३० – जी.एन.एम. / स्टाफ नर्सिंग
(ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. २०,०००/-)

| अ.क्र | रिक्त पदे | अ.जा | अ.ज. | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र. | इ.मा. व. | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **स्टाफ नर्स** | ४ | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ११ | ३० |

२. लॅब टेक्निशिअन (**Lab Technician**) - १९ - बी.एस.सी. डी.एम.एल.टी
(ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. १७,०००/-)

| अ.क्र | रिक्त पदे | अ.जा | अ.ज. | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज. (ड) | वि.मा. प्र. | इ.मा व. | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | **लॅब टेक्निशिअन** | ३ | १ | १ | १ | ० | ० | ० | ४ | २ | ७ | १९ |

➢ राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील शैक्षणिक पात्रता/अर्हता –

| अ.क्र | पदनाम | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | रिक्त पदे | ठोक मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (Staff Nurse) | अ.जा.-४<br>अ.ज.-१<br>विजा (अ)-१<br>भ.ज (ब)-१<br>भ.ज (क)-१<br>भ.ज.(ड)-१<br>वि.मा.प्र.-१<br>इ.मा.व.-६<br>ईडब्ल्यूएस-३<br>खुला-११ | 12th Passed with GNM / BSc. Nursing MNC कडील नोंदणी अनिवार्य, अनुभव असल्यास प्राधान्य | ६५ वर्षापर्यंत तसेच निवृत्त शासकिय, अधिकारी कर्मचारी असल्यास ७० वर्षापर्यंत.<br>६० वर्षांवरील सर्व उमेदवारांना वैद्यकिय दृष्ट्या फिट असल्याचे शासकिय रुग्णालयाचे प्रमाणपत्र | ३० | रु.२०,०००/- |
| २ | लॅब टेक्निशिअन (Lab Technician) | अ.जा.-३<br>अ.ज.-१<br>विजा (अ)-१<br>भ.ज (ब)-१<br>इ.मा.व.-४<br>ईडब्ल्यूएस-२<br>खुला-७ | BSc. With DMLT, अनुभव असल्यास प्राधान्य | | १९ | रु.१७,०००/- |

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील कर्मचारी यांची पदभरती

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत खालिल दर्शविलेल्या पदांसाठी कंत्राटी पद्धतीने मासिक ठोक मानधन तत्वावर योग्य शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेल्या स्टाफ नर्स व लॅब टेक्निशिअन असे एकूण ४९ पदांकरीता आरक्षण निहाय भरती करीता अर्ज मागविण्यात येत आहे.

➢ राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावरील शैक्षणिक पात्रता/अर्हता –

| अ.क्र | पदनाम | आरक्षण | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | रिक्त पदे | ठोक मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (Staff Nurse) | अ.जा.-४<br>अ.ज.-१<br>विजा (अ)-१<br>भ.ज (ब)-१<br>भ.ज (क)-१<br>भ.ज.(ड)-१<br>वि.मा.प्र.-१<br>इ.मा.व.-६<br>ईडब्ल्यूएस-३<br>खुला-११ | 12th Passed with GNM / BSc. Nursing MNC कडील नोंदणी अनिवार्य, अनुभव असल्यास प्राधान्य | ६५ वर्षापर्यंत तसेच निवृत्त शासकिय, अधिकारी कर्मचारी असल्यास ७० वर्षापर्यंत. ६० वर्षावरील सर्व उमेदवारांना वैद्यकिय दृष्ट्या फिट असल्याचे शासकिय रुग्णालयाचे प्रमाणपत्र | ३० | रु.२०,०००/- |
| २ | लॅब टेक्निशिअन (Lab Technician) | अ.जा.-३<br>अ.ज.-१<br>विजा (अ)-१<br>भ.ज (ब)-१<br>इ.मा.व.-४<br>ईडब्ल्यूएस-२<br>खुला-७ | BSc. With DMLT, अनुभव असल्यास प्राधान्य | | १९ | रु.१७,०००/- |

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण- नवीन प्रशासकिय इमारत, ६ वा मजला, वैद्यकिय आरोग्य विभाग, भिवंडी, ता. भिवंडी, जि.ठाणे

अर्ज स्विकारण्याची दिनांक – ०४/०२/२०२२ ते दि. १५/०२/२०२२

अर्ज स्विकारण्याची वेळ - सकाळी- १०:३० ते दु. ०६:०० वा.

**टिप - परिस्थितीनुसार पदसंख्येत बदल होऊ शकतो.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या www.bncmc.gov.in या संकेत स्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात अटी व शर्तीसह प्रसिद्ध करण्यात येत आहे. संकेत स्थळावरील जाहिरातीला अनुसरुन विहीत अर्हता व अटींची पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील वैयक्तिक माहिती व आवश्यकत्या सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतींसह उपरोक्त नमुद तारखेस अर्ज समक्ष सादर करावे. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापुर्वी महापालिकेच्या संकेत स्थळावरील सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

स्वाक्षरी
XXX
आयुक्त तथा अध्यक्ष
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
राष्ट्रीय आरोग्य अभियान
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**१. <u>पद भरती गुणांकनाची विस्तृत कार्यपद्धती खालिलप्रमाणे राहिल –</u>**

१.१ इच्छुक उमेदवारांनी दि०४/02 /२०२२ ते दि.१५ /02/२०२२ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत ऑफलाईन पद्धतीने वैद्यकिय आरोग्य विभाग, ६ वा.मजला येथे अर्ज सादर करावेत.

१.२ जाहिरातीत नमुद आवश्यक कर्मचा-यांची मान्यता प्राप्त शिक्षणाच्या गुणांकानुसार यादी भिवंडी नि. शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१.३ राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत ठोक मानधनावर स्टाफ नर्स व लॅब टेक्निशिअन या पदांसाठी मा. आयुक्त सो., कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडील मार्गदर्शक सुचनेनुसार गुणांकनाची पद्धत अवलंबली जाईल.

१.४ निवड झालेले उमेदवार व प्रतिक्षायादी मधील उमेदवार यांची यादी पुढीला ८ दिवसांच्या आत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वैद्यकिय आरोग्य विभागातील नोटीस बोर्डवर व भिवंडी नि. शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१.५ निवड यादी गुणानुक्रमे प्रसिद्ध करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.

१.६ प्रतिक्षा यादीची विधी ग्राह्यता १ वर्षाची असेल. निवड झालेले उमेदवार रुजू न झाल्याने अथवा कार्यरत असलेले उमेदवार सोडून गेल्याने पुढील १ वर्षात कोणतेही पद रिक्त झाल्यास सदर पद प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून भरण्यात येईल.

१.७ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर येथे नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत आणावी.

१.८ सर्व पदांकरिता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१.९ अर्ज सादर करण्यासाठी येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही.

१.१० फक्त याच जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे यापुर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच इतर राज्यातुन महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१.११ उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदीत पदांच्या सर्व अर्हता व अटी पुर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतुन कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१.१२ शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७ जुन २०११ नुसार (I) परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागु राहणार नाही.

(II) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखिल अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(III) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/ उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

१.१३ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्यासंदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१.१४ एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समितीवरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, राजकिय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविणेत येईल.

१.१५ बिंदु नामावली नुसार राखिव प्रवर्गात अनुसरुन पद भरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेद्वारे अपेक्षित राखिव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेवून व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविणेचे अभियान आहे. ही बाब लक्षात घेवून मार्च २०२२ या कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

१.१६ राखिव जागेवर खुल्या प्रवर्गातुन उमेदवारांची केलेली नियुक्ती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेली असल्याने संबंधीत राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त झाल्यानंतर अशी नियुक्ती संपुष्टात येईल.

१.१७ राष्ट्रीय आरोग्य अभियानातील पदे ही कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे मागासवर्गीय उमेदवारांच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येणार नाही. उमेदवारांनी फक्त जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र (Validity) यांची साक्षांकित छायाप्रत सादर करावी.

१.१८ पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातील अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या-त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१.१९ सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ, दि.२६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्या समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१.२० सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना क्र.एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परीपत्रक क्र.एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८/०३/२००५ नुसार हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबतच्या नमुन्यात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्रात अविवाहीत असे लिहून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१.२१ अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate), तसेच जातीचा दाखला उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अ.जा./अ.ज. उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसले बाबत (Non creamy-layer certificate) प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपुर्ण असजुन नाकारला जाईल.

१.२२ वि.जा.अ., भ.ज.ब, भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिकाराचे जात व मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१.२३ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती/अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. शासकिय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

१.२४ एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांसकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८ मधिल निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

१.२५ अंतीम निवड यादीमधिल पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (Original copy) कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधिल प्रमाणपत्र खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

१.२६ निवड झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेचा मुळ प्रमाणपत्र संबंधित मंडळ/विद्यापीठ/संस्था यांचे जवळ पाठवून सत्यता पडताळणी करण्यात येईल. त्यात खोटी आढळल्यास संबंधितांना नोकरीतुन कमी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

१.२७ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्र सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१.२८ निवड झालेल्या उमेदवारा विरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. (१ माहच्या आत)

१.२९ जाहिरातीमधिल नमुद पदसंख्येत बदल होऊ शकतात व सदर भरती रद्द करणेचे अधिकार आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

१.३० प्रशासकिय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना आहेत.

**२. विशेष सुचना :-**

१.१ सेवायोजन कार्यालय, ठाणे/मुंबई, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प अधिकारी, शहापूर, बोरीवली, मुंबई यांचेकडे नोंदणी केलेल्या उमंदवारोनी देखिल या जाहीरातीनुसार आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मुळ/साक्षांकित प्रतींसह/वैयक्तिक माहितीसह अर्ज सादर करावा.

१.२ मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातुन फसवणूक झाल्यास महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१.३ अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१.४ अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोयीनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. ज्या नागरी आरोग्य केंद्रांवर नियुक्ती झाल्यास तेथे सेवा देणे बंधनकारक राहिल.

स्वाक्षरी

02/02/2022

आयुक्त तथा अध्यक्ष
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
राष्ट्रीय आरोग्य अभियान
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील

प्रतिज्ञापन

नमुना-अ

प्रतिज्ञापत्र

नमुना-अ

(नियम ४ पहा)

मी श्री. / श्रीम. ---------------------------------------- श्री.----------------------------------------

यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय---------- वर्षे, राहणार --------------------------------------------

याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१)मी------------------------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२)आज रोजी मला---------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या------------ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३)हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणिव आहे.

ठिकाण :-

अर्जदाराची सही/-

दिनांक :-

## अर्जाचा नमुना

(पदाचे नाव :---------------------------------------------------- पदांचा सांकेतिक क्र.----------)

**प्रति,**

**मा. आयुक्त सो.,**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,

नवीन प्रशासकिय इमारत, भिवंडी.

ता. भिवंडी, जि.ठाणे. पिन-४२१३०२

(१) संपुर्ण नाव : मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)

१. आडनाव : ------------------------ --------------------------

२. स्वत:चे नाव : ------------------------ --------------------------

३. वडिलांचे / पतीचे नाव : ------------------------ --------------------------

(२) पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोड सहित) : ------------------------------------------------------

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ------------------------------------------------------

(३) अ) जन्मतारीख : तारीख महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) मुलाखतीच्या दिनांक रोजीचे वय : ----------- वर्ष ------------- महिने ----------- दिवस

(४) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(५) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? : होय / नाही

(६) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वत:चा प्रवर्ग खालिलप्रमाणे लागू असलेल्या चौकटीमध्ये ✓ अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एसईबीसी | एसबीसी | ईडब्ल्युएस | अराखिव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

(७) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/ विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

(८) अनुभव :

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकूण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(९) वरील पदांसाठी (सांकेतिक क्र.----------- अर्ज भरला असून मी )

| अंशकालीन | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | खेळाडू | इतर (समांतर आरक्षण व्यतिरीक्त) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(१०) अवगत असणा-या भाषा (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(११) आपणाविरुद्ध न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

(१२) अर्जासोबत खालिल (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) आधार कार्ड
२) शाळा सोडल्याचा दाखला
३) दहावी, बारावी अथवा पदवीधर / पदवीत्तर किंवा तांत्रिक अर्हतेचे प्रमाणपत्र
४) अनुभवाचा दाखला
५) जात प्रमाणपत्र / जात पडताळणी प्रमाणपत्र
६) अधिवास प्रमाणपत्र
७) क्रिमिलेअर / नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र
८) पासपोर्ट साईज फोटो -- २

(१३) मी असे प्रमाणित करतो / करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणिव आहे.

अर्जदाराची सही/-

ठिकाण :-

दिनांक :-